**सुभाषित :**

जेतुं यस्त्रिपुरं हरेण हरिणा व्याजाद्बलिं बध्नता स्रष्टुं वारिभवोद्भवेन भुवनं शेषेण धर्तुं धराम् |
पार्वत्या महिषासुरप्रमथने सिद्धाधिपैः सिद्धये ध्यातः पञ्चशरेण विश्वजितये पायात्स नागाननः ||

**अर्थ :**

त्रिपुरासुराच्या तीन पुरांचा नाश करण्यासाठी भगवान शंकरांनी, याचनेच्या मिषाने बळीला पकडण्यासाठी श्रीविष्णूंनी, जगताची निर्मिती करण्यासाठी ब्रह्मदेवाने, शेषाने पृथ्वीचा भार घेण्याची ताकद यावी म्हणून, महिषासुराचा वध करण्याच्यावेळी जगदंबेने, सिद्धी प्राप्त करण्यासाठी सिद्धांनी, सर्व विश्व पादाक्रांत करण्यासाठी मदनाने ज्याचं (विजय मिळावा, विघ्नं येऊ नयेत म्हणून ज्या गजमुखाचं) मनात चिंतन केलं तो गजमुख (जशा त्यांच्या इच्छा त्यांनी पूर्ण केल्या तशा आमच्या पण पूर्ण करून आमचे) रक्षण करो.